**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्त अधिकऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या प्रचलीत नियमानुसार प्रथमत: एक वर्षासाठी विवक्षित कामासाठी करार पध्दतीने सेवा घेणे व नामसुचिका तयार करण्यासाठी खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. हे अर्ज दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ पर्यंत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत म्हणजेच सकाळी ९.४५ वाजेपासून ते सांयकाळी ६.१५ वाजेपर्यत कार्यासन अधिकारी (विशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, चौथामजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात पाठवावेत. विहित मुदतीत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | सेवानिवृत्ती पूर्वीचे पद | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | उप सचिव | १ | १. उमेदवार शासकीय / निमशासकीय सेवेतून या पदावरुन किंवा वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.<br>२. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील कामाचा अनुभव असावा.<br>३. संगणकाबाबतचे ज्ञान अवगत असावे. |

सदर कामांचे स्वरूप आणि नियुक्तीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

**अ) कामाचे स्वरुप:-**

१) विद्यापीठांकरिता पदनिर्मिती करण्यासाठी दिनांक १ ऑगस्ट, १९७९ पासून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांचा संग्रह तयार करणे.

२) विद्यापीठाकरिता मंजूर असलेल्या पदांचे दिनांक १ ऑगस्ट, १९७९ पासून वर्षनिहाय कोष्टक तयार करणे.

३) मंजूर पदांच्या समोर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वर्षनिहाय कोष्टक तयार करणे. संबंधित वर्षी मंजूर पदांच्या मर्यादेत कर्मचारी कार्यरत होते काय, याबद्दल अभिप्राय देणे.

४) कालबाह्य ठरलेली पदे निरसित करण्यासंदर्भात अभिप्राय देणे.

५) उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली अन्य कामे.

६) विद्यापीठांमधील ७ व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितीच्या उर्वरित प्रकरणांवर काम करणे.

७)वेतननिश्चिती आणि आकृतिबंध यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांवर विद्यापीठे आणि सहसंचालक कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना मार्गदर्शन / प्रशिक्षण देणे.

**ब) नियुक्तीच्या अटी व शर्ती:-**

१) सदर नियुक्ती एक वर्ष किंवा उपरोक्त कामे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत राहील. अनुक्रमांक १ ते ५ येथील कामे पूर्ण करुन अहवाल सादर करण्यासाठी ६ महिने इतका कालावधी विहित करण्यात आला आहे.

२) सदर नियुक्ती करार पद्धतीने करण्यात येणार असल्याने त्यांना शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत / सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क राहणार नाही.

३) नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहिल, तसे बंधपत्र / हमीपत्र भरून देणे आवश्यक आहे.

४) संबंधित अधिकाऱ्यांचे पारिश्रमिक मासिक वेतन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील परिच्छेद २ (ड) अनुसार राहील.

५) कोणतीही आगाऊ सूचना न देता संबंधित सेवानिवृत अधिकारी, यांच्या करार पद्धतीअंतर्गत सेवा समाप्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील. यासाठी कारणे देणे नियुक्ती प्राधिकाऱ्यांवर बंधनकारक राहणार नाही.

६) नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपविलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.

७) करार पद्धतीच्या नेमणूकीच्या कालावधीत कार्यालयीन कामकाजासाठी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळी असलेल्या वेतनमानास अनुसरून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

८) सोपविलेले कामकाज विहीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

९) नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्याकडे कार्यालयीन कामकाजाच्या निमित्ताने प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

************